१. लेख संगणकीकृत व एम.एस. वर्डमध्ये तयार केलेले असावेत.
२. फॉन्ट इंग्रजी साठी न्यू टाईम्स रोमन साईज १२ व मराठीत मंगल/योगेश फॉन्ट (युनिकोड) साईज १२ पाईन्ट एवढा वापरावा. **कृपया कृतीदेवचे फॉन्ट वापरू नयेत.**
३. पेपर साईज अे फोर. समास सर्व बाजूंना १ इंच एवढा असावा.
४. अंकाला आयएसबीएन क्रमांक असेल.

चिंतनलेख पाठविण्यासाठी इमेल आयडी : nmscon18@gmail.com

शुल्क प्राचार्य, नूतन महाविद्यालय, सेलू यांच्या नावाचा राष्ट्रीयकृत बँकेचा ड्राफ्ट पाठवावा किंवा महाविद्यालयाच्या खालील बँक खात्यात शुल्क जमा करावे.

प्राचार्य नूतन महाविद्यालय, सेलू
बँक : स्टेट बँक ऑफ इंडिया
शाखा : सेलू,
खाते क्रमांक : 52149590152
आयएफसी कोड : SBIN0020022

..............................


नूतन महाविद्यालय, सेलू-४३१५०३.
जि. परभणी.

- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड संलग्नीत
- नॅक पुनर्मूल्यांकन "ब" दर्जा
- आयएसओ ९००१:२००८ प्रमाणित

**दूरभाष :** (०२४५१) २२२००४,२२३०८०
**email** - principalnutan@rediffmail.com
**website :** www.nutanmahavidyalaya.com


**समर्पित सेवेची ५० वर्षे**

**आयोजन समिती:**

**मा. डॉ. विद्यासागर पंडित**
कुलगुरु, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**मा. डॉ. वऱ्हाडे एस. बी.**
अध्यक्ष, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा संशोधन संस्था, औरंगाबाद

**मा. श्री. प्राचार्य शरद अदवंत**
सचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा संशोधन संस्था,औरंगाबाद

**मा. श्री. सुरेश देशपांडे**
कोषाध्यक्ष, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा संशोधन संस्था, औरंगाबाद

**मा. डॉ. एस.एम. लोया**
अध्यक्ष, नूतन विद्यालय शिक्षण संस्था, सेलू

**डॉ. प्राचार्य शरद कुलकर्णी**
नूतन महाविद्यालय, सेलू

**श्री. यादव गायकवाड**
उपप्राचार्य व समन्वयक,
नूतन महाविद्यालय सुवर्ण महोत्सव समिती,

**डॉ. संतोष दंडवते**
संयोजक, चर्चासत्र

**प्रा. डॉ. निर्मला पद्मावत**
संयोजक, अंतर्गत दर्जा व गुणवत्ता कक्ष

**डॉ. प्रकाश कंठाळे**
सह-संयोजक, अंतर्गत दर्जा व गुणवत्ता कक्ष

**कु. उषा कदम**
कार्यालय अधिक्षक, नूतन महाविघालय, सेलू


पुस्त-प्रेष

प्रति,
मा.कुलगुरू,
महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय,
वर्धा.(सेन्ट्रल युनिव्हर्सिटी)

नूतन विद्यालय शिक्षण संस्था संचलित

# नूतन महाविद्यालय, सेलू
## जिल्हा परभणी

सुवर्ण महोत्सवी वर्ष
१९६८-२०१८



# राज्यस्तरीय चर्चासत्र

## "महाराष्ट्रातील व मराठवाड्यातील उच्चशिक्षण एक तौलनिक अभ्यास"

**दिनांक १७ फेब्रुवारी २०१८**

**आयोजक**
- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा इन्स्टिट्यूट ऑफ सोशिओ इकॉनॉमिक रिसर्च ॲण्ड नॅशनल इंटिग्रेशन, औरंगाबाद.
- नूतन महाविद्यालय, सेलू जि. परभणी.

## सप्रेम नमस्कार

नूतन विद्यालय शिक्षण संस्था संचलित नूतन महाविद्यालय, सेलू हे सन २०१७-२०१८ **सुवर्ण महोत्सवी वर्ष** म्हणून साजरे करत आहे. हैद्राबाद संस्थान स्वातंत्र्य लढ्यातील अग्रणी असलेल्या मराठवाड्यातील सेलू या गावी नूतन विद्यालय शिक्षण संस्थेची स्थापना सन १९३९ मध्ये झाली. तर नूतन महाविद्यालयाची स्थापना सन १९६८ मध्ये करण्यात आली. तेव्हापासून ते आजतागायतही उच्च शिक्षणाविषयी गंभीरपणे चिंतन करणारी संस्था म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात परिचित आहे.

महाविद्यालयाला आपल्या उद्देशपूर्ती करण्याकरीता मदत करणाऱ्या अनेक संस्था आहेत. त्यापैकी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड. नॅकव्दारे या विद्यापीठाला 'अ' दर्जाचे मानांकन प्राप्त आहे. या विद्यापीठाने आजपर्यंत अनेक उपक्रमासाठी महाविद्यालयाला आर्थिक पाठबळ दिले आहे.

तसेच दुसरी संस्था म्हणून जिचा उल्लेख करता येईल अशी संस्था म्हणजे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा इन्स्टिट्यूट ऑफ सोशिओ-इकॉनॉमिक रिसर्च ॲण्ड नॅशनल इंटिग्रेशन, औरंगाबाद ही होय. ही संस्था भूतपूर्व हैद्राबाद संस्थानच्या स्वातंत्र्य संग्रामाचे एक अतुलनिय राजकीय व शैक्षणिक, अध्यात्मिक नेते पूजनीय स्वामी रामानंद तीर्थ यांच्या स्मरणार्थ स्थापन केलेली स्वयंसेवी संस्था आहे. तेलंगनासह महाराष्ट्राच्या मराठवाड्यातील आठही जिल्ह्यात ही संस्था कार्यरत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून ह्या संस्थेने अनेकविध कार्यक्रम व संशोधन प्रकल्प हाती घेतले व पूर्ण केले आहेत. गेले अनेक वर्ष ही संस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची मान्यताप्राप्त संशोधन संस्था म्हणून कार्यरत आहे. या संस्थेच्या वतीने अनेक उपक्रम राबवीले जातात. अन्य समविचारी, सहप्रवासी असलेल्या व्यक्ती, सस्थांना ही संस्था सर्वोतोपरी सहकार्य करीत असते. या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थाना उत्तेजन देण्याचे कार्यही ही संस्था आज पर्यंत करते आहे.

महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात उच्च शिक्षणाच्या बाबतीत सखोल अभ्यास करता यावा या दृष्टीने या दोन्ही संस्थानी आम्हाला या चर्चासत्रासाठी आर्थिक पाठबळ दिलेले आहे.

## चर्चासत्राविषयी

मराठवाड्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रेरक नेतृत्वामुळे उच्च शिक्षणाचा पाया रचला गेला. सन १९५० ते २०१७ म्हणजे जवळपास ६७ वर्षांत महाराष्ट्रात उच्च शिक्षणाचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला आहे. शैक्षणिक संस्थांची मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. तसेच शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी संख्येमध्येही संख्यात्मक दृष्टीने मोठी वाढ झाली आहे. हे एका बाजूला दिसणारे सत्य असले, तरीही महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाडा हा उच्च शिक्षणाच्या बाबतीत आजही बऱ्याच बाबतीत मागे असल्याची चर्चा नेहमीच होत असते. सुवर्ण महोत्सवी वर्षात या बाबतीत गंभीरपणे आत्मचिंतन करावे, असे वाटणे हे आमच्या आजपर्यंतच्या भूमिकेचे सार आहे. या निमित्ताने मराठवाडा व महाराष्ट्रातील उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात काम करण्याऱ्यांना, शिक्षण तज्ज्ञांना एका व्यासपीठावर आणण्याची योजना, सुवर्ण महोत्सव आयोजन समितीने मांडली व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा इन्स्टिट्यूट ऑफ सोशिओ-इकॉनॉमिक रिसर्च ॲण्ड नॅशनल इंटिग्रेशन, औरंगाबादने या बाबतीत आर्थिक मदत व सहकार्य करण्याची भूमिका घेतली.

मराठवाड्यातील सुप्रतिष्ठीत उच्च शिक्षणातील सर्व शिक्षणसंस्था, या मध्ये कार्यरत असणारे ध्येयनिष्ठ शिक्षक व विचारवंत यांना आम्ही या चर्चासत्राच्या निमित्ताने आमंत्रित करण्याचे योजिले आहे. या निमित्ताने होणारे आत्मचिंतन हे सर्वांसाठी दिशादर्शक ठरेल, याची आम्हाला खात्री आहे.

### चर्चासत्राचे विचारसूत्र

या चर्चासत्रात खालील बाबीवर आत्मचिंतन व्हावे हे प्रस्तावीत आहे.

१. उच्च शिक्षणासमोरील आव्हाने
२. महाराष्ट्र व मराठवाड्यातील उच्च शिक्षण एक तौलनिक अभ्यास
३. महाराष्ट्र व मराठवाड्यातील तंत्रशिक्षण एक तौलनिक अभ्यास
४. महाराष्ट्र व मराठवाड्यातील शेतीशिक्षण एक तौलनिक अभ्यास
५. पारंपारिक कला-वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील शिक्षणाचे नवे आयाम
६. उच्च शिक्षणातील अभ्यासक्रम व मूल्यांकनाच्या समस्या
७. उच्च शिक्षणातील माध्यमाचा प्रश्न
८. मराठवाड्यातील उच्च शिक्षणाची दर्जा विषयक समस्या व उपाय योजना
९. मराठवाड्यातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समस्या व उपाय योजना
१०. महाराष्ट्रातील उच्च शिक्षण व आंतरराष्ट्रीय पातळीवरील उच्च शिक्षण एक तौलनिक अभ्यास
११. उच्च शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर
१२. मराठवाडा विभागातील उच्च शिक्षणाच्या नॅक मानांकनातील अडचणी व उपाय
१३. मराठवाड्यातील संशोधनचा दर्जा, समस्या व उपाय योजना
१४. महाराष्ट्र व मराठवाड्यातील शिक्षणप्रसार आणि शिक्षणाच्या बाबतीत उपेक्षित राहीलेला वर्ग
१५. मराठवाड्यातील उच्च शिक्षण क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या शिक्षण संस्थाची भूमिका, समस्या व उपाय योजना

### चर्चासत्रात सहभाग

उच्च शिक्षण क्षेत्रात कार्य करणाऱ्या व उच्च शिक्षणांशी संबधीत असणाऱ्या प्रत्येकाला या चर्चासत्रात सहभागी होता येईल.

### प्रकाशन

या चर्चासत्राच्या निमित्ताने आपण आपले मनोगत लेखी स्वरुपात मांडावेत ही अपेक्षा आहे. या चर्चासत्राच्या निमित्ताने एक अंकही प्रकाशित करण्याचा आमचा मानस आहे. आपले आत्मचिंतन हे कायम स्वरुपात राहावे व या क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींसाठी ते कायमस्वरुपी अभ्यासासाठी उपलब्ध व्हावे हा त्यामागचा उद्देश आहे. या निमित्ताने आपण करणार असलेले आत्मचिंतन लेख स्वरुपात दिनांक १५ फेब्रुवारी २०१८ पर्यंत महाविद्यालयाकडे पोंहचतील याची आपण काळजी घ्यावी. आपले चिंतन कृपया संगणकावर टंकलेखित करुन दिलेल्या पत्त्यावर प्रसिध्दी शुल्क सह रुपये १,००० च्या राष्ट्रीयकृत बँकेच्या डिमांड ड्राफ्टच्या स्वरुपात किंवा महाविद्यालयाच्या बँक खात्यात निफ्ट व्दारे पाठवावे. चर्चासत्रात उपस्थित राहण्यासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जाणार नाही. कृपया आपले चिंतन लेख संगणकावर टंकलेखित करतांना पुढील प्रकारची काळजी घ्यावी.